## वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.३१/१०/२०२१

## प्रेसनोट

केंद्र शासनाच्या सूचनांना अनुसरून राज्यामध्ये व त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

लसीकरणाच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यासाठी राज्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने **दि.२५ ऑक्टोबर, २०२१ ते ०२ नोव्हेंबर, २०२१** या कालावधीमध्ये " **मिशन युवा स्वास्थ्य** " अंतर्गत विशेष लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेत असलेल्या १८ वर्षे व त्याहून अधिक वय असलेले विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, अधिकारी वर्ग व त्यांचे कुटुंबातील १८ वर्ष व त्याहून अधिक वय असलेले लाभार्थी यांचे पहिल्या व पात्र लाभार्थ्यांचे दुसऱ्या डोससाठीचे कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण प्राधान्याने करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने खालील नमूद महाविद्यालयांमध्ये दिनांक **०१ नोव्हेंबर , २०२१** रोजी कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरणाचे नियोजन करण्यात आले आहे.

MISSION YUVA SWASTHYA
(SPECIALLY FOR STUDENTS)

| SR. NO | UPHC | NAME OF VACCINATION CENTRES | TOTAL DOSES (Covishield) |
|---|---|---|---|
| 1 | NIDAN | New Viva College Session, Virar (W) 100% OFFLINE | 200 |
| | NARINGI | Viva college of engineering & technology bramhanpada virar (E) 100% OFFLINE | 500 |
| 2 | PATANKAR PARK | Zakeria junior college, Nalasopara(W) 100% OFFLINE | 300 |
| TOTAL NO OF DOSES | | | 1000 |

या लसीकरण सत्राचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थ्यांनी घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

**"कोरोनाची लस घेऊया, तिसऱ्या लाटेपासून तरुणाईला वाचवूया"**

*** मिशन युवा स्वास्थ्य ***

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका